दै. गोदातीर दि. ०२/०२/२५

# रासेयो शिबिरातून संस्काराची शिदोरी मिळते -पोनि बिर्ला



**किनवट (प्रतिनिधी)** - राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून विद्यार्थ्यांना आयुष्यभर पुरेल, अशी संस्काराची शिदोरी मिळते. त्यासाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील शिबिरात अनुभव घेऊन सुसंस्कारीत राष्ट्र निर्माणासाठी पुढे यावे, असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक सुनील बिर्ला यांनी केले.

किनवटच्या सरस्वती विद्या मंदिर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर बोधडी बु.येथे संपन्न झाले. बुधवारी दि. २९ रोजी समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

'युथ फॉर माय भारत, युथ फॉर डिजिटल लिटरसी' या विषयाला घेऊन दि.२३ ते २९ जानेवारीपर्यंतच्या सात दिवसांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पोनि बिर्ला म्हणाले की, विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेपासूनच कायदा, सुव्यवस्था याचे भान ठेवावे. पोलिसांची प्रत्येक ठिकाणी गरज न पडू देता आपणच सक्षम पोलीस होऊन समाज उभारणीत योगदान द्यावे. कार्यक्रमाधिकारी डॉ. मार्तंड कुलकर्णी यांनी सात दिवसांमध्ये विद्यार्थ्यांनी बौद्धिक श्रमदान तसेच मनोरंजनाच्या विविध अशा कार्यक्रमांचा कसा आनंद घेतला, याचा उहापोह प्रास्ताविकातून केला. पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांनीही मत मांडले. अशा शिबिरातून विद्यार्थी सक्षम नागरिक तयार होतो, असे मत पत्रकार आशिष देशपांडे यांनी व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. आनंद भंडारे यांनी अशा शिबिरांची आवश्यकता व्यक्त केली. अध्यक्षीय समारोपात कृष्णकुमार नेमानीवार यांनी मनोगत मांडले. सूत्रसंचालन डॉ. किरण आयनेनीवार यांनी केले. नेहा मडावी हिने स्वागत गीत गायिले. कार्यक्रमाधिकारी डॉ. मनोहर थोरात यांनी आभार मानले. यावेळी सात दिवशी शिबिरात भाग घेतलेल्या वैभव मेटकर, करण घोगेवार, दत्ता ढोले, कु. कोमल मेश्राम, कु. नेहा मडावी यांनी आपले अनुभव व्यक्त केले. शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

गोदातीर

# जिल्हा पोलीस दलातील १२ जण सेवानिवृत्त



**नांदेड (प्रतिनिधी)** - जिल्हा पोलीस दलातील दोन उपनिरीक्षक, चार श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, चार सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आणि दोन पोलीस अंमलदार असे १२ जण सेवानिवृत्ती झाले आहेत. पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय) डॉ. अश्विनी जगताप यांच्या हस्ते त्यांना निरोप देण्यात आला.

पोलीस उपनिरिक्षक रमेश गिरी (पोलीस ठाणे सिंदखेड), शेख आयुब शेख इमामसाब (नियंत्रण कक्ष नांदेड), श्रेणी पोलीस उपनिरिक्षक चाँद पाशा नुरपॉशा सय्यद (पोलीस ठाणे किनवट), केशव राठोड (पोलीस ठाणे, भोकर), रामचंदर दराडे (पोलीस ठाणे, माहूर), शिवाजी वड (अर्धापूर), सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक नागोराव आत्राम (माहूर), आनंद कंधारे (वजिराबाद), विनायक बाबर (कंधार), यशवंत जाधव (इतवारा), पोलीस अंमलदार अनिलकुमार लाठकर (सोनखेड), पंडीत कदम (पोलीस ठाणे इतवारा) यांना दि. ३१ रोजी मंथन सभागृहात सहकुटूंब सन्मान करून पोलीस उपअधिक्षक डॉ. अश्विनी जगताप यांनी निरोप दिला. यावेळी पोलीस निरीक्षक नामदेव रिठे, पोलीस उपनिरीक्षक माया भोसले, पोलीस अंमलदार सविता भिमलवाड यांची उपस्थिती होती.